दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990







लातूर वर्ष ४ थे अंक २२४ वा बुधवार दि.२६ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# तब्बल २,३६५ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत

लातूर : ग्राहकांना अखंडित, उत्कृष्ट व दर्जेदार सेवा देण्यासाठी विकलेल्या वीजबिलांची शंभर टक्के वसुली करण्यासाठी महावितरण आक्रमक झाली असून बील भरण्यास टाळाटाळ करणा-या थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा तात्काळ खंडीत करण्याची मोहीम मवितरणने हाती घेतली आहे. गेल्या २४ दिवसांत २ हजार ३५६ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

मार्च महिण्याची चाहूल लागताच महावितरणने वीजबील वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. थकबाकीसह चालू महिण्याचे वीजबील वसूल करणे महावितरणसमोर एक आव्हानच असते. आज रोजी लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील लातूर परिमंडळाच्या वीजग्राहकांकडे जानेवारी अखेर २९९ कोटी रूपयांची थकबाकी असून फेब्रुवारी महिण्याची ८४ कोटी ५४ लाख रूपयांची मागणी आहे.

थकबाकी व मागणी असे एकत्रीत ३८३ कोटी ६१ लाख रूपयांची वसूली फेब्रुवारी अखेर पर्यंत करावयाची आहे. यामध्ये लातूर जिल्हयातील ९६ कोटी ७७ लाख, बीड जिल्हयातील १५९ कोटी ९८ लाख तर धाराशिव जिल्हयातील १२६ कोटी ८५ लाख रूपये रकमेचा समावेश आहे. गेल्या २४ दिवसात बीड जिल्हयातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडून १९ कोटी ९२ लाख रूपये वसुल झाले आहेत. तसेच धाराशिव जिल्हयातील वीजग्राहकांकडून १६ कोटी २२ लाख रूपये वसुल झाले आहेत. तर लातूर जिल्हयातील वीजग्राहकांनी ३३ कोटी ५२ लाख रूपयांचा भरणा केला आहे.



थकबाकी वसुलीसाठी जनमित्रांसह अधिकारीही वीजबील वसुलीसाठी फिरत असून गेल्या २४ दिवसात बील न भरणा-या २१५७ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा तोडण्यात आला आहे. तर १९९ वीजग्राहकांचा कायमस्वरूपी वीजपुरवठा तोडण्यात आला आहे. वसुली मोहीम मार्च अखेर पर्यंत प्रभावीपणे राबवण्यात येणार असून वीजग्राहकांनी चालू बीलांसह थकबाकीचाही भरणा करावा अन्यथा कटू कारवाईस सामोरे जावे लागेल असा इशारा महावितरणने दिला आहे. कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या वीजग्राहकांना अभय योजने अंतर्गत थकबाकी वरील व्याज व दंड माफ करण्यात येणार असून योजनेचा लाभ ग्रहकांनी घ्यावा असेही महावितरणने कळवले आहे.

खंडीत केलेल्या वीजग्राहकांची जिल्हानिहाय माहिती

१. बीड मंडळ- कायमस्वरूपी- ९० तात्पुरता- ४४७

२.धाराशिव मंडळ- कायमस्वरूपी- ३९, तात्पुरता- ९३३

३. लातूर मंडळ- कायमस्वरूपी- ७०, तात्पुरता- ७७७

# साबला येथे महाशिवरात्री निमित्त स्वच्छता अभियान संपन्न.



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मौजे साबला या गावी उत्तरेश्वर महाराज साबला येथे महाशिवरात्री निमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले . केज तालुक्यातील मौजे साबला येथे उत्तरेश्वर महाराज यांच जागृत देवस्थान असल्यामुळे येथील तरुण मित्रमंडळींनी स्वच्छता अभियान राबवलं त्याची सुरुवात श्रीराम भक्त हनुमान महाराज मंदिर ते उत्तरेश्वर महाराज जागृत देवस्थाना पर्यंत चा रस्ता व मंदिर परिसरातील पूर्ण स्वच्छता करण्याचं काम तरूणांनी पूर्ण केलं, तसेच गेल्या अनेक वर्षांपासून साबला येथील तरूण मित्रमंडळी साबला या गावात नेहमी कोणत्यानं कोणत्या कारणाने गावात स्वच्छता अभियान राबवत आहेत . गावातील तरुणाचं असं मत आहे माझा गाव , स्वच्छ गाव माझा गाव , सुंदर गाव या प्रमाणे गावातील तरुण मित्रमंडळी या अभियानात सहभागी होतात . आणि स्वच्छता अभियान राबवण्याचे काम करतात . या मध्ये आदर्श शिक्षक नरहरी काकडे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , माजी उपसरपंच काशिनाथ नाईकनवरे , इंजिनियर महेशराव काकडे , राहुल मुळे , गणेश कटारे , लखन राऊत , राजेभाऊ काकडे , वसंत नाईकनवरे , संदिपान काकडे , अनंत नाईकनवरे , अनिल भोसले , सदाशिव काकडे , जालींदर मुळे इत्यादी तरूण मित्रमंडळींनी या स्वच्छता अभियानात अगदी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला आहे.

# रिपब्लिकन सेनेत : विष्णू वासमनी सह असंख्य कार्यकर्त्यांचा जाहीर पक्ष प्रवेश

नवी मुंबई / के.एच. हनवते :- दिनांक २२/ ०२/ २०२५ रोजी दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर मुंबई येथे रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, बहुजन हृदय सम्राट, तरुणांचे प्रेरणास्थान, सरसेनानी : आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र भाऊ लगाडे यांच्या प्रयत्नाने नवी मुंबईतील हनुमान नगर येथील बहुसंख्य तरुणांनी रिपब्लिकन सेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. रिपब्लिकन सेना या पक्षात विष्णू वासमनी यांच्यावर विश्वास ठेवून नवी मुंबई जिल्हा सचिव पदी त्यांची नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सह सागर घाडगे, राजेंद्र सोनवणे, विश्वदीप सूर्यवंशी, कुमार वासमनी, त्रिशरण गवळी, अरविंद गायकवाड, मारुती दोडमनी, वसंत आलमेल, विठ्ठल सुळण, रमेश धिवार, रोहित सूळण, भोगेश मडपे, सचिन होसमनी, सचिन जन्ना, व दिलीप बळसाने या सर्व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी प्रमुख उपस्थिती रिपब्लिक सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सर सेनानी आनंदराज आंबेडकर तसेच महाराष्ट्राचे सचिव विनोद काळे, व ठाणे जिल्हा अध्यक्ष आबासाहेब चासकर नवी मुंबई युवा जिल्हाध्यक्ष : अमोल पटेकर इत्यादी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते रिपब्लिकन



सेनेच्या नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदाची जिम्मेदारी सांभाळल्यापासून नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र भाऊ लगाडे यांनी पक्ष वाढविण्याचा झपाटा लावला आहे आतापर्यंत शेकडो कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. व अजूनही शेकडो युवक रिपब्लिकन सेने मध्ये जाहीर प्रवेश करणार आहेत.

# केज तालुक्यात माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना.. ज्येष्ठ नागरिकांना विचारमंच मिळणार.

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांची सभा रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४-०० वाजता केज पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी केज पंचायत समितीचे माजी सभापती तथा स्वामी दयानंद प्रतिष्ठान केजचे संस्थापक अध्यक्ष ड.राजेसाहेब देशमुख यांची उपस्थिती होती.



उपस्थित सर्वांच्या विचार विनीमयातुन केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संघटना स्थापन करण्याचे ठरले. ज्येष्ठ नागरिक गिन्यानदेव गदळे यांनी संघटनेचे नाव माऊली ज्येष्ठ नागरिक संघ असावे असे सुचविले उपस्थित ड. विजयकुमार कुलकर्णी यांनी नावास अनुमोदन दिले. केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी संघटित होवून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांन ा वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या विविध उपक्रमांना विचारमंच मिळवून देण्यासाठी या संघटनेची निर्मिती करण्यात आली.कार्यकारिणी मध्ये संघटनेचे अध्यक्ष म्हणून ड.राजेसाहेब देशमुख,गिन्यानदेव गदळे-सचिव,रामेश्वर जाजु-कोषाध्यक्ष,कापरे -उपाध्यक्ष, ड. विजयकुमार कुलकर्णी-कार्याध्यक्ष, साखरे-सहसचिव,मधुकरराव लांडगे -सहसचिव व सर्व सदस्य लक्ष्मणराव यादव, उद्धवराव तरकसबंद, लक्ष्मणराव जाधव, वासुदेवराव डोंगरे आदींचा समावेश आहे. या कार्यकारिणीस रमेशराव खंदारे,प्रा. हनुमंतराव भोसले,रामराव राऊत, वल्लभदास जाजु, रामचंद्र जाधव, प्रदिप कल्याणकर यांनी अनुमोदन दिले.माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची वरिष्ठ कार्यालयात नोंद करणे व इतर आवश्यक कार्यवाहीचे सर्व अधिकार नवनिर्वाचित कोषाध्यक्ष रामेश्वर जाजु यांना सर्वांच्या संमतीने देण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विचारमंच निर्माण करणे व त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा उपयोग संघटनेच्या माध्यमातुन समाजाचे वैचारिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरण सुधारण्यासाठी 'कल्पवृक्षाचे'' काम करावे असा निर्धार संघटनेने केला.कार्यक्रमाचे संचालन प्रा. हनुमंत भोसले यांनी केले.अध्यक्षीय समारोपानंतर डि.एस.साखरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी तालुक्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक सभेस उपस्थित होते. चहापानानंतर सभेची सांगता




# येवता येथे शिवजयंती निमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते शेतकरी पुत्र शिवभक्त गणेश दादा फरताडे यांच्या भव्य व्याख्यानाचा कार्यक्रम

केज/प्रतिनिधी शिवजयंती निमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते शेतकरी पुत्र शिवभक्त गणेश दादा फरताडे यांच्या भव्य व्याख्यानाचा कार्यक्रम येवता येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळे समोर दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ठीक ८ ते ९ या वेळेमध्ये होणार आहे तरी शिवजन्मोत्सव समीतीच्या वतीने अनावश्यक खर्च टाळून सर्व शिवभक्तांना शिवव्याख्याते गणेश दादा फरताडे यांच्या वाणीतून शिवचरित्र ऐकण्याची सुवर्णसंधी येवता येथील शिवभक्तांनी उपलब्ध केली आहे . सर्व समाजातील घटकांना एकत्र करून जसे श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली याच उक्ती प्रमाणे येवता गावातील सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यासह परिसरातील सर्व शिवभक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव समीतीच्या वतीने करण्यात आले आहे. तरी केज तालुक्यातील सर्व शिव भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# उन्हाळ्यासाठी वाळवणीच्या पदार्थांमध्ये सोप्या पद्धतीत बनवा बटाट्याचे पापड, नोट करा रेसिपी





उन्हाळा ऋतूला सुरुवात झाल्यानंतर सर्वच घरांमध्ये पापड, सांडगे, लोणचं, कुरडया इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. पापड हा पदार्थ लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप आवडतो. जेवणात तोंडी लावण्यासाठी पापडचे सेवन केले जाते. याशिवाय उपवासाच्या दिवशी बटाटा किंवा साबुदाण्याचे पापड खाल्ले जातात. मात्र आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये बटाट्याचे पापड बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हे पापड तुम्ही पंख्याखाली सहज सुकवू शकता. कारण शहराच्या ठिकाणी पापड किंवा वाळवणाचे पदार्थ सुकवण्यासाठी जास्त जागा नसते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये पंख्याखाली सुकवता येतील अशा पापडाची रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया बटाट्याचे पापड बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: बटाटा मीठ जिरं काळीमिरी पावडर बटर पेपर तेल कृती: बटाट्याचे पापड बनवण्यासाठी सर्वप्रथम, बटाटा स्वच्छ धुवून कुकरमधून व्यवस्थित शिजवून घ्या. बटाटा कच्चा ठेवू नये. शिजवून घेतलेला बटाटा थंड झाल्यानंतर त्याची साल काढून मॅश करा. हाताने मॅश करून झाल्यानंतर पिठाप्रमाणे बटाट्याचे मिश्रण बनवून घ्या.

त्यानंतर त्यात जिरं, चवीनुसार मीठ, काळीमिरी पावडर टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा.

तयार करून घेतलेल्या मिश्रणाचे छोटे छोटे खाली ठेवा. पापड सुकल्यानंतर कढईमध्ये कडकडीत तेल गरम करून पापड तळून घ्या.

तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले बटाट्याचे पापड.

# नरेंद्र मोदींनी देशाला केले मोठे आव्हान, लठ्ठपणा दूर करण्यासाठी सांगितले 'हे' प्रभावी उपाय





देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमादरम्यान भारतामध्ये वाढलेल्या लठ्ठपणाविषयी बोलताना चिंता व्यक्त केली आहे. दैनंदिन आहारात होणाऱ्या चुकीच्या सवयी आणि जीवनशैलीमध्ये सतत होणाऱ्या बदलांमुळे आरोग्यावर अनेक गंभीर परिणाम दिसून येतात. त्यात प्रामुख्याने लठ्ठपणामध्ये वाढ झाली आहे. शरीरात लठ्ठपणा वाढल्यानंतर आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. याशिवाय आरोग्यासंबंधित अनेक आजार वाढू लागतात. मधुमेह, कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाबाची पातळी वाढल्यानंतर शरीरातील इतर अवयवांनासुद्धा हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे आहारात शरीराला पचन होणाऱ्या पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कार्यक्रमादरम्यान करण्यात आलेल्या संधोधनचा उल्लेख करत म्हणले, देशामध्ये आठ जणांपैकी एक व्यक्ती लठ्ठपणामुळे त्रस्त आहे. याशिवाय गेल्या काही वर्षांमध्ये लठ्ठपणात मोठ्या दुप्पट वाढ झाली आहे. हल्ली अनेकजण लठ्ठपणामुळे त्रासले आहेत. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. जगभरात सुमारे २.५ अब्ज लोक लठ्ठपणा आणि वाढलेल्या वजनाने त्रस्त आहेत. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणले, मी देशातील दिनेश लाल यादव निरहुआ, उद्योजक आनंद महिंद्रा,मनु भाकर, आर माधवन, ओमर अब्दुल्ला,गायिका श्रेया घोषाल, नंदन नीलेकणी, सुधा मूर्ती, मोहनलाल , मीराबाई चानू यांना दैनंदिन आहारातील १० % खाद्यतेल कमी करण्याचा सल्ला देईन. याशिवाय त्यातील १० लोकांना मी हेच आव्हान देईन. यामुळे लठ्ठपणाशी लढण्यासाठी मदत होईल, असे नरेंद्र मोदी म्हणले.

वाढलेले वजन कमी करण्यासाठी प्रभावी उपाय:

नट्स आणि बियांच्या तेलाचा वापर:

दैनंदिन आहारात वापरले जाणारे तेल आरोग्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. या तेलात असलेले अधिक फॅट्स शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवतात, ज्यामुळे लठ्ठपणा आणि इतर आजार वाढण्याची शक्यता असते. दैनंदिन आहारात पामतेल किंवा शेंगदाण्याच्या तेलाचा वापर करण्याऐवजी तेलकट काजू आणि बिया इत्यादींचा वापर करावा. बदाम, हेझलनट आणि सूर्यफूल इत्यादींचा वापर करून तयार केलेले तेल वापरू शकता. या तेलात निरोगी चरबी आढळून येते, ज्यामुळे शरीरावर वाढलेली अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होईल.

ऑलिव्ह ऑइल:

रोजच्या आहारात अनेक लोक ऑलिव्ह ऑइलचा वापर करतात. याशिवाय आरोग्यासंबंधित इतर समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी ऑलिव्ह ऑइल अतिशय प्रभावी आहे. या तेलात असलेले गुणधर्म शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी प्रभावी ठरतात. ऑलिव्ह ऑइलमध्ये शिजवलेल्या अननपदार्थांचे सेवन केल्यास वारंवार भूक लागत नाही.

तेलाचे कमी सेवन केल्यास लठ्ठपणा कमी होईल:

अनेक लोक जेवण बनवण्यासाठी वेगवेगळ्या तेलांचा वापर करतात. मात्र जास्त प्रमाणात तेलाचा वापर केल्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. त्यामुळे स्वयंपाकातील १० टक्के तेल कमी केल्यास वाढलेला लठ्ठपणा कमी होईल आणि वाढलेली चरबीसुद्धा जाळून जाईल. रोजच्या वापरातील १० टक्के तेलाची खरेदी कमी केल्यास आहारातील १० टक्के तेल कमी होण्यास मदत होईल, अन्यथा कमी होणार नाही. जेवण तयार करताना तेलाचा वापर अतिप्रमाणात केल्यामुळे मधुमेह, ताणतणाव आणि हृदयरोग इत्यादी आजार वाढू शकतात.

# सकाळी उठताच हेल्थ ड्रिंक प्यायल्यास शरीरात काय घडते? तज्ज्ञांनी केला खुलासा

सकाळी उठल्यानंतर कितीही घाईल असली तरी एक ग्लास हेल्थ ड्रिंक प्यायल्याशिवाय अनेकांची सकाळ सुरू नाही. पण जर तुम्ही सलग दोन आठवडे रोज सकाळी हेल्थ ड्रिंक प्यायले त्याचा तुमच्या शरीरावर कसा परिणाम होतो हे तुम्हाला माहित आहे का? याच प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी इंडियन एक्स्प्रेसने आरोग्य तज्ज्ञांशी संवाद साधला. चेन्नईतील श्री रामचंद्र उच्च शिक्षण आणि संशोधन संस्थेतील क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट आणि लेक्चरर्स सी व्ही ऐश्वर्या म्हणाल्या की, दिवसाची सुरुवात हेल्थ ड्रिंक किंवा माल्टेड पेयाने केल्याने शरीरावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम होऊ शकतात, जे त्याच्या रचनेनुसार असतात. माल्टेड पेय म्हणजे माल्टेड बार्ली , हॉप्स(हॉप्स म्हणजे ह्युम्युलस ल्युपुलस नावाच्या वनस्पतीची फुले) आणि इतर घटकांपासून बनवलेले आंबवलेले पेय. माल्ट पेये अल्कोहोलिक किंवा नॉन-अल्कोहोलिक असू शकतात. अनेक माल्टेड पेयांमध्ये रिफाइंड शुगर किंवा माल्ट अर्क असतो, ज्यामुळे रक्तातील ग्लुकोजच्या पातळीत जलद वाढ होऊ शकते, त्यानंतर अचानक कमी होते ज्यामुळे लवकरच थकवा आणि भूक लागते. पण, कमी ग्लायसेमिक इंडेक्स घटक असलेले हेल्थ ड्रिंक्स, जसे की प्रथिने-किंवा फायबर-समृद्ध घटक, रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास आणि दीर्घकाळ तृप्त होण्यास मदत करतात, असे ती म्हणाली. तिच्या मते जर पेयात प्रोबायोटिक्स , प्रीबायोटिक्स किंवा फायबर असतील तर ते फायदेशीर आतड्यांतील बॅक्टेरियाच्या वाढीस चालना देऊन पचन आणि आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. पण, साखरेचे प्रमाण जास्त असलेले पेये किंवा कृत्रिम पदार्थ कालांतराने आम्लता, पोटफुगी आणि आतड्यांमध्ये दाहकता होण्यास कारणीभूत ठरू शकतात.

# वयाच्या १९-२० व्या वर्षी अक्षय खन्नाला पडले टक्कल; म्हणाला, अभिनेता म्हणून आत्मविश्वास खचला.. वाचा, तज्ज्ञ याविषयी काय सांगतात





सध्या चर्चेत असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यावर आधारित 'छावा' चित्रपटाने सर्वांची मने जिंकली आहेत. 'छावा' सिनेमात औरंगजेबाची भूमिका अभिनेता अक्षय खन्नाने साकारली आहे. अक्षय खन्नाने त्याच्या भूमिकेला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. उत्तम अभिनय केल्याने अक्षय खन्नावर सध्या कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. वयाच्या १९-२० व्या वर्षी टक्कल पडल्याने अक्षयच्या आत्मविश्वासावर कसा परिणाम झाला होता, याविषयी त्याने स्वत: एकदा सांगितले होते.

तो म्हणाला होता, एवढ्या लहान वयात माझ्याबरोबर हे व्हायला लागलं. माझ्यासाठी हे एखाद्या पियानो वादकाने आपली बोटे गमावल्यासारखे होते. त्या दिवसांत मला असेच वाटायचे. जेव्हा तुम्ही ते स्वीकारता तेव्हा तुम्हाला कमी त्रास होतो, पण हे खूप निराशाजनक होतं.

तो पुढे सांगतो, यामुळे तुम्ही तुमच्या करिअरचे एक दोन वर्ष गमावू शकता, कारण अभिनेता म्हणून तुम्ही कसे दिसता हे खूप महत्त्वाचे आहे. विशेषत: चेहरा खूप महत्त्वाचा असतो. शरीर थोडे फार लपवले जाऊ शकते, पण १९-२० व्या वर्षी टक्कल पडणे हे उद्ध्वस्त करणारं होतं, निराशाजनक होतं. हे तुम्हाला मानसिकदृष्ट्या खचवते, त्याचा खूप जास्त नकारात्मक परिणाम एक तरुण अभिनेता म्हणून माझ्या आत्मविश्वासावर झाला. २०२० मध्ये मिड डेला दिलेल्या एका मुलाखतीत अक्षय याविषयी उघडपणे बोलला होता. लवकर टक्कल पडणे आणि त्याचा एखाद्यावर कसा परिणाम होतो, हे समजून घेऊ या.

वयाच्या १९-२० व्या वर्षी लवकर टक्कल पडणे हे अनुवांशिकता, कुटुंबात यापूर्वी कुणाला असेच लवकर टक्कल पडले असेल तर हार्मोनल बदल आणि जीवनशैलीतील घटक जसे की तणाव, पौष्टिक कमतरता, वजन कमी करणे, औषधी, खूप जास्त हेअरस्टाइल बदलणे, केसांवर उपचार आणि थायरॉइड इत्यादी समस्यांमुळे दिसून येते; असे मुंबई येथील डॉ. शरीफा स्किन केअर क्लिनिकच्या डर्मेटोलॉजिस्ट डॉ. शरीफा चाऊस यांनी सांगितले.

लवकर टक्कल पडण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे डायहायड्रोटेस्टोस्टेरोन हार्मोन. हा हार्मोन केसांना कमकुवक करतो आणि केस गळण्याची समस्या उद्भवते. डॉ. चाऊस सांगतात, केस गळण्याची लक्षणे म्हणजे केस जास्त पातळ होणे, केसांच्या गुठळ्या होणे, केशरचना कमी होणे किंवा डोक्यावर टक्कल पडणे.

अक्षय खन्ना यांनी सांगितल्याप्रमाणे, लवकर टक्कल पडणे एखाद्याच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावर कसा परिणाम करू शकते?

डॉ. चाऊस सांगतात, एखाद्याला लाज वाटू शकते, निराशाजनक वाटू शकते आणि ते समाजात वावरणे टाळू शकतात; यामुळे तणाव, एंग्झायटी, नैराश्य आणि वैताग येऊ शकतो.

डॉ. चाऊस सांगतात की, बदल स्वीकारणे आणि आपले केस कसे दिसतात यापलीकडे आपली स्वत:ची किंमत समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. त्या पुढे सांगतात, लक्षात ठेवा, तुम्हाला आतून काय जाणवतं यावरून तुमचा आत्मविश्वास निर्माण होतो, फक्त तुम्ही कसे दिसता यावरून नाही.

या गोष्टी करा टक्कल पडल्यानंतर त्यावर एका रात्रीमध्ये उपचार होईल असे शक्य नाही. बायोटिन सप्लिमेंट्स, जीवनशैलीत बदल; जसे की पौष्टिक आहार आणि योग तसेच ध्यानाद्वारे तणाव कमी करण्यास मदत होते, यामुळे केस गळणे थोड्या फार प्रमाणात कमी होण्यास मदत होते.

प्रोटिन समृद्ध आहार, बायोटिनसारखे व्हिटॅमिन्स आणि टाळूची योग्य काळजी घेणेसुद्धा केसांच्या आरोग्यास फायदेशीर ठरू शकते. केस गळण्याचे प्रमाण वाढण्यापूर्वी त्यामागील कारणं शोधा आणि योग्य उपचार घेण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या, असे डॉ. चाऊस सांगतात.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी वर्षाच्या ३०० दिवस करतात मखाणाचे सेवन! जाणून घ्या पोषणयुक्त मखाणाचे फायदे





केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात बिहारमध्ये मखाणा बोर्ड स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर मखाणा बोर्ड स्थापन करण्याच्या दिशेने वाटचाल करण्यात आली. २४ फेब्रुवारीला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील भागलपूर येथे जाऊन शेतकऱ्यांच्या जाहीर सभेला संबोधित केले. त्यावेळी भाषणात मोदी म्हणाले, मखाणा हे एक सुपरफूड आहे. हे जगाच्या बाजारपेठमध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, कमळाच्या बियांची लागवड शेतकऱ्यांसाठी खूप प्रभावी आणि फायदेशीर ठरू शकते, असे मोदी म्हणले. त्यानंतर पुढे बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, मी वर्षातील ३६५ दिवसांपैकी ३०० दिवस मखाणा खातो. हा एक सुपरफूड आहे, जो जागतिक बाजारपेठेत उपलब्ध करून द्यावा लागतो. या वर्षीच्या अर्थसंकल्पात मखाणा उत्पादकांसाठी मखाणा मंडळ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली. हे मंडळ मखाणा उत्पादकांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत करेल.

पंत्रप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आज देण्यात आलेल्या किसान सन्मान निधीच्या १९ व्या हप्त्याचा बिहारमधील ७५ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांना फायदा झाला आहे. आज बिहारमधील शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे १६०० कोटी रुपये थेट पोहोचले आहेत. याशिवाय विरोधकांवर टीका करताना मोदी म्हणाले, यूपीए सरकारच्या काळात शेतकऱ्यांना खतांसाठी लाठीमार करावा लागला. युरियाचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार झाला. परंतु एनडीएच्या राजवटीत गेल्या १० वर्षांत शेतकऱ्यांना पुरेसा युरिया आणि डीएपी मिळत आहे. केंद्र सरकार ३००० रुपयांच्या खतावर अनुदान देऊन शेतकऱ्यांना ३०० रुपयांपेक्षा कमी किमतीत ते उपलब्ध करून देत आहे.

मखाणा खाण्याचे फायदे:

आरोग्य सुधारते:

दैनंदिन आहारात मखाणा खाल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. मखाणापासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. याशिवाय हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी मखाणा खाण्याचा सल्ला दिला जातो. सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी भूक लागल्यानंतर तेलकट किंवा तिखट पदार्थांचे सेवन करण्याऐवजी आहारात मखाणाचे किंवा मखाणापासून बनवलेल्या पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. मखाणामध्ये कॅल्शियम, प्रथिने, व्हिटॅमिन बी १२ आणि फॉस्फरस इत्यादी अनेक घटक आढळून येतात.

हाडांच्या आरोग्यासाठी प्रभावी:

हाडे दुखणे, हाडांमध्ये वेदना होणे, हाडे कमकुवत होणे, गुडघे दुखणे इत्यादी अनेक गंभीर समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात नियमित मखाणा खावा. यामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. कॅल्शियम युक्त पदार्थांमध्ये आहारात प्रामुख्याने मखाणा खाण्याचा सल्ला दिला जातो. मखाणामध्ये कार्बोहायड्रेट्स आणि प्रोटीन मुबलक प्रमाणात आढळून येतात. त्यामुळे हाडांमध्ये निर्माण झालेली कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी नियमित मखाणा खावा.


रोगप्रतिकारशक्ती वाढते: शरीराची कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी दैनंदिन आहारात मखाणा खाण्याचा सल्ला दिला जातो. सकाळी रिकाम्या पोटी मखाना खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. यामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात. ज्याचा आपल्या शरीराला फायदा होतो. यामुळे अनेक वेगवेगळ्या आजारांपासून वाचण्यास मदत होते.

# त्वचेवरील टॅनिंग, काळे डाग घालवण्यासाठी नारळाच्या तेलातर मिक्स करा 'हे' पदार्थ, त्वचा होईल देखणी

महिला आणि पुरुषांसह सगळ्यांचं नेहमी सुंदर दिसायचं असत. सुंदर दिसण्यासाठी महिला सतत काहींना काही उपाय करत असतात. मात्र कोणत्या ना कोणत्या कारणामुळे त्वचेवर पिंपल्स आल्यानंतर ते घालवण्यासाठी बाजारात उपलब्ध असलेले क्रीम्स लावले जातात. याशिवाय महिला पिंपल्स आल्यानंतर क्लीनअप करून घेतात. मात्र यामुळे त्वचेमध्ये फारसा बदल दिसून येत नाही. दैनंदिन आहारात झालेल्या बदलांचा परिमाण त्वचेवर लगेच दिसून येतो. पिंपल्स, मुरूम किंवा ऍक्ने आल्यानंतर त्वचेवर काळे डाग तसेच राहतात. त्यामुळे त्वचेवरील टॅनिंग आणि डार्क स्पॉट घालवण्यासाठी खोबऱ्याच्या तेलात कोणते पदार्थ मिक्स करून लावावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. यामुळे त्वचा अतिशय सुंदर आणि देखणी होईल. खोबऱ्याचे तेल त्वचेसाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. या तेलात असलेले गुणधर्म त्वचेसंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळवून देण्यासाठी मदत करतात. त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी खोबऱ्याच्या तेलाचा वापर करू शकता. याशिवाय नारळाच्या तेलात फॅटी सिड आणि विटामिन ई इत्यादी घटक आढळून येतात. त्वचेवरील इन्फेक्शनपासून सूक्त मिळवण्यासाठी आणि बॅक्टेरियापासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी खोबऱ्याच्या तेलाचा वापर तुम्ही करू शकता. नैसर्गिक गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या नारळाच्या तेलात अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात.

कोरफड आणि खोबऱ्याचे तेल:

त्वचेवरील टॅनिंग आणि सुरकुत्या कमी करण्यासाठी तुम्ही खोबऱ्याच्या तेलात कोरफडचा गर मिक्स करू शकता. यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये खोबऱ्याचं तेल घेऊन त्यात कोरफड





जेल टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर तयार केलेले मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवा. त्यानंतर पाण्याने त्वचा स्वच्छ धुवा. यामुळे चेहऱ्यावरील टॅनिंग कमी होईल आणि त्वचा उजळदार, सुंदर दिसते. कोरफड जेल त्वचेला लावल्यामुळे त्वचा अधिक हायड्रेट आणि स्वच्छ राहते.

खोबऱ्याचे तेल आणि लिंबाचा रस:

लिंबाच्या रसात आढळून येणारे घटक त्वचेच्या आरोग्यासाठी प्रभावी ठरतात. यामुळे चेहऱ्यावर आलेले काळे डाग कमी होऊन त्वचा अधिक सुंदर आणि उजळदार दिसते. त्वचेवरील सुरकुत्या कमी करण्यसाठी नारळाच्या तेलाचा वापर करावा. वाटीमध्ये लिंबाचा रस घेऊन त्यात खोबरेल तेल टाकून मिक्स करा. त्यानंतर तयार केलेले मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर लावून १० मिनिटं तसेच ठेवा. नंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवा. हा उपाय नियमित केल्यास त्वचेवरील टॅनिंग आणि काळे डाग कमी होण्यास मदत होईल.

# स्वकर्तृत्वाने राजा बनणारे एकमेव राजे छ. शिवाजी महाराज - दिपक राजाभाऊ इंगळे

मुरुड/ महेंद्र आल्टे : छत्रपती शिवाजी महाराजांनी बालपणीच राजा होण्याचा निर्धार करून वयाच्या १६ व्या वर्षी तोरणा गड जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. असंख्य अडथळे व संकटे असताना स्वकर्तृत्वाने राजे बनले. आज विद्यार्थ्यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, ध्येय निश्चित करून , कठोर परिश्रम करून ठरवलेले ध्येय साध्य करून आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे. असे उद्गार राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दिपक इंगळे यांनी काढले.

मुरुड येथील संभाजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतनिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम हे होते. विचारमंचावर प्रा. डॉ. बी. एम. गोरे आणि रमाकांत माळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले की , छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे असून त्यांचा लढा हा धार्मिक नसून राजकीय होता. महाराजांचे अंगरक्षक, सेनापती व खजिनदार मुस्लिम होते. त्यांच्या सैन्यात ७०० पठाणांची फौज होती. त्यामुळे त्यांना मुस्लिमविरोधी ठरवणे हे देशहिताच्या दृष्टीने घातक आहे.






आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अशोक काळम म्हणाले की , छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांच्या राज्यात स्त्रियांना न्याय दिला, त्यांचा सन्मान केला व स्त्रियांवर अन्याय करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिल्या. म्हणून राजे हे इतरांप्रमाणे स्त्रियांना नाचवणारे नव्हते तर वाचविणारे होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.उन्नती केवळराम या विद्यार्थिनीने केले तर उपस्थितांचे आभार कु.पायल माने या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. अंबाड आर. एफ. , प्रा. सौ. महाजन पी. बी. , प्रा. उपाडे व्ही. यू. व प्रा. डॉ. बी. एम. गोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रा. डॉ. भगत जी. एम. , प्रा. डॉ. एम. व्ही. चावरे , प्रा. एम. बी. गायकवाड, प्रा. डी. आर. चव्हाण , प्रा. मकरंद गिरी , प्रा. पाटोळे ए. आर. व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी ई-पीक पाहणी, 'ग्रीस्टॅक' नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर, दि. २५ (जिमाका) : लातूर तालुक्यातील ई-पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज हे संबंधित गावचे तलाठी यांचे सहाय्यकामार्फत करण्यात येत आहेत. या ई-पीक पाहणीची शेवटची तारीख २८ फेब्रुवारी, २०२५ आहे. तरी लातूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी सहाय्यकाद्वारे लवकरात लवकर ई-पीक पाहणी करुन घ्यावी.
तसेच ग्रीस्टॅकअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरु आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) काढणे बंधनकारक आहे. लातूर तालुक्यातील शेतकरी संख्या ९७ हजार ६६२ एवढी आहे. त्यापैकी आजपर्यंत २३ हजार ३२७ एवढ्याच शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी केली आहे. ग्रीस्टॅक हे यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गिक आपत्ती अनुदान, पीक कर्ज, मुलाच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, मुलाच्या शैक्षणिक प्रवेशाकरिता लागणारे शेतकरी कुटूंबांतील दर्शविणारा पुरावा व इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे.
शेतकरी ओळख क्रमांक काढण्यासाठी आधारकार्ड आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट नंबर माहित असे आवश्यक आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी लवकरात लवकर आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र, महाईसेवा केंद्र, महाईसेवा केंद्र येथे संपर्क करुन आपली नोंदणी करुन घ्यावी, असे लातूर तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेचा पहिला हप्ता बँकेत पडला, घरकुलासाठी लागणारी मोफत वाळूचे काय?



किनवट: शेख शौकत :-प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचा पहिला हप्ता शनिवारी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाला आहे. आता लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती देण्याची व्यवस्था करण्यात यावी. मोफत ५ ब्रास रेती मिळावी यासाठी महसूल विभागाला सूचना करा, अशी मागणी घरकुलाचे लाभार्थी करीत आहेत. प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेसाठी किनवट तालुक्याचे १४ हजार २३१ उद्दिष्ट असताना १२ हजार ९२८ घरकुलाला मंजुरी देण्यात आली आहे. तर, ११ हजार ६३७ लाभार्थ्यांच्या खात्यात २२ फेब्रुवारी रोजी पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. १२ हजार ९२८ लाभार्थ्यांचे पक्क्या घराचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे. पण, रेती चोरट्यांकडून महागडी रेती खरेदी करणे न परवडणारी बाब आहे. शासनाच्या मोफत पाच ब्रास रेती या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी अपेक्षा लाभार्थ्यांनी आमदार भीमराव केराम यांच्याकडे केली आहे. लिलाव नसलेल्या रेती घाटातून वारेमाप उपसा करून गरजवंताला बेभाव विकत आहेत. मोफत पाच ब्रास रेती देण्यासाठी महसूल विभागाला सूचना केल्या तर ११ हजार ६३७ लाभार्थ्यांना ५८ हजार १८५ ब्रास रेती मोफत मिळण्यास मदत होणार आहे.

## सन २०२४-२०५ या वर्षामध्ये निर्यातक्षम आंबा पिकांची मॅंगोनेट प्रणालीव्दारे शेत नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर, दि. २५ (जिमाका) : युरोपियन यूनियन व इतर देशांना आंबा निर्यातीसाठी अपेडाच्या मॅंगोनेट प्रणालीव्दारे निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी केली जाते. सन २०२४-२५ मध्ये आज अखेर महाराष्ट्र राज्य ९ हजार ४५९ निर्यातक्षम आंबा बागांची नोदणी झालेली आहे. निर्यातक्षम आंबा बागाची मॅंगोनेट या ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती. परंतु, अपेडा नवी दिल्ली कार्यालयाकडे विनंती करूनही मुदत २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.
त्यामुळे उर्वरित कालावधीत विशेष मोहीम राबवून आंबा बागांची नोंदणी कृषी विभागामाफत करण्यात येणार आहे. युरोपीय युनियन व अमेरिका देशाला आंबा निर्यात करण्यासाठी क्षेत्रीय , शेतकरी स्तरावर ठेवायचे दस्तऐजवचे विहीत प्रपत्रात जनत करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालयाने दिल्या आहेत. निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी विहीत नमुन्यात प्रपत्र-१ मध्ये अर्ज करावा. अर्जासोबत सातबारा, आठ अ , आधारकार्ड जोडावे. त्यानंतर तपासणी अधिकाऱ्यांमार्फत कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्ष कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी यांच्यामार्फत क्षेत्राची तपासणी करुन प्रपत्र ४ अ मध्ये अहवाल जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना सादर केला जातो. त्यानंतर २ ब प्रपत्रात नोंदणी प्रमाणपत्र अदा केले जाते. शेतकऱ्यांनी पिक संरक्षणाच्या दृष्टीने शेतात राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या बाबींच्या नोंदी प्रपत्र क मध्ये नोंदी वेळेत घेणे आवश्यक आहे.
सर्व आंबा बागायतदारांनी सन २०२४-२०२५ मध्ये चालू हंगामाकरिता नोंदणी करण्यासाठी संबंधित कृषी सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधून मॅगोनटद्वारे नोंदणीसाठी त्वरीत अर्ज करावेत. प्रथम नोंदणी व नूतणीकरण करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज, सातबारा , आठ अ , बागेचा नकाशा व आधारकार्ड इत्यादी कागदपत्राची आवश्यकता आहे. मॅंगोनेटद्वारे नोंदणी करण्याची वाढीव व अंतिम मुदत २८ फेब्रुवारी, २०२५ अशी आहे. निर्यातक्षम आंबा बागांची वेळेत नोंदणी करण्याकरिता संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून विहीत मुदतीत नोंदणी करण्याचे आवाहन फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी केले आहे.

## बुद्ध-फुले-शाहू - आंबेडकर चळवळीला जिवाचं दान देणारा महान लोककलावंत : प्र. पोखरीकर (दादा) काळाच्या पडद्याआड.



नवी मुंबई के एच. हनवते :- आंबेडकर चळवळीला आपलं सर्वस्व अर्पण करून ज्यांनी आपलं सर्व जीवन व्यथित केल. अशा या थोर महान कवी/गायक प्रभाकर पोखरीकर दादा यांचे दिनांक : २४ /२/२०२५ रोजी प्रदीर्घ आजाराशी झुंज देऊन निधन झाले. त्यांनी असंख्य बुद्ध - भीमगीत आम्हा सर्वांना दिपस्तंभ होऊन आम्हाला वाट दाखवतात की, आम्ही माणसा सारखे माणसे आसुन आम्हाला इतरांप्रमाणे जीव असून निर्जीवा सारखी वागणूक इथली विषमता देत होती, म्हणून (दादांनी) आपल्या लेखणीतून गित गायनातून जीवाला जीवाचं दान माझ्या भीमानं दिलं , छाती ठोक हे सांगु जगाला असा विद्वान होणार नाही..!, रमाई बाबासाहेबाना सोडून गेल्या नंतर त्यांना काय वाटल असेल त्या बद्दल लिहितात तुझ्या विना रमा मजला सुने सुने सारे जग वाटे... तसेंच पाऊल पुढचे पुढे हे टाकणार आहे मी ,... वाट किती मी पाहू येशील कधी भिवा ,..हे पाणी आणिले मी माठ भरुनी घोटभर जा हो पीऊनी अशी असंख्य भीमगीत फक्त मोठ्यांच्याच नव्हे तर लहान लेकरांच्या तोंडी ही मुखपाठ आहेत. अशा शिलवान, चरित्रवान, गुणवान, अभ्यासू वृत्तीचा व्यासंग, गजलकार, चिकित्सकवृत्ती असणाऱ्या कवी, भीमशाहीर, गायक, सच्चा भीमसैनिक : प्रभाकर पोखरीकर दादा यांना भावपुर्ण श्रद्धांजली विनम्र अभिवादन..! के. एच. हनवते (सहसंपादक दैनिक महावृत्त) परिवार तर्फे

## मेथी - मेळकुंदा येथे श्री लक्ष्मी देवी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि यात्रा महोत्सव उत्साहात

उदगीर : उदगीरपासून जवळ असलेल्या कर्नाटकातील भालकी तालुक्यातील मौजे मेथी-मेळकुंदा येथे दि. १९ ते २३ फेब्रुवारी २०२५ या पाच दिवसीय श्री लक्ष्मी देवी मूर्ती स्थापना, प्राणप्रतिष्ठा आणि लक्ष्मी यात्रा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. ही परंपरा शिवकालीन काळापासून सुरू असून, मागील तीन वर्षांप्रमाणे याही वर्षी हा महोत्सव नियमितपणे आयोजित करण्यात आला.

या महोत्सवासाठी मेळकुंदा - वाडी, लंजवाड, तेलगाव, काकनाळ, लखनगाव, बोरोळ (ल.), विजयनगर (गौंडगाव), शिवनी, तामगाळ, भाटसांगवी, बोळेगाव, पांढरी, हलसी, जिरगाळ, वागलगाव, खुदावंदपूर, इंचूर, भातंब्रा, रामतीर्थवाडी, भालकी इत्यादी गावांतील भक्तगण मोठ्या भक्तिभावाने उपस्थित होते. या सोहळ्यास हजारोंच्या संख्येने भाविक, स्थानिक नागरिक आणि परिसरातील इतर गावांतील भक्तगणांनी हजेरी लावली. श्री लक्ष्मी देवीची मूर्ती गावातील ज्येष्ठ नागरिक गोविंदराव उर्फ बाबुराव कुलकर्णी (दिवाणजी) यांच्यावतीने देण्यात आली आहे. त्यांच्याच हस्ते विधीवत पूजा,



मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींनी देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या पाच दिवसांत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन आदींचे आयोजन करण्यात आले. समारोपानंतर सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी माजी सरपंच दिलीपराव बिरादार तसेच रघुनाथ बिरादार, कटराव बिरादार, श्याम बिरादार, बाबुराव बिरादार, संभाजी बिरादार, माधवराव बिरादार, देविदास बिरादार, सुनील बिरादार, पै. अमर बिरादार, प्रमोद बिरादार, दत्ता बिरादार, तुकाराम बिरादार, किशोर कानेगावे, मधुकर कानेगावे, श्रीनिवास कानेगावे, अमर कानेगावे, नामदेवराव गुरनाळे, शिवाजीराव गुरनाळे, सुधाकर गुरनाळे, तुकाराम मोरे, रमेश मोरे, बाबुराव पाटील, शेषेराव पाटील, कृष्णा पाटील, अप्पाराव रेड्डी, रामचंद्र रेड्डी, शिवा रेड्डी, हरिप्रसाद रेड्डी, गणेश रेड्डी, भीम रेड्डी, मल्लिकार्जुन गुड्डे, धनराज गुड्डे, संगप्पा बोरोळे, शिवराज तेली, राजेंद्र घोरपडे, प्रकाश घोरपडे, सतीश मोहिते, आकाश मोहिते, शिवाजीराव केदारे, महेश केदारे, शिवप्रसाद केदारे, नंदकुमार कुलकर्णी, राहुल तामगाळे, भगवान महाराज, ओमप्रकाश पवार, आकाश वाघ, शिवराज कुंभार, संतोष कुंभार, नंदकुमार बेल्लापुरे, मनोहर म्हेत्रे, तायाब बागवान, जोशी, कदम, जाधव, मरतोळे, वांजरखेडे, स्वामी, पारशेट्टे, गुडाकवाले, डफेदार, शेख, लासूणे, गोसावी, पांचाळ (सोनार), वाघमारे, लोहार, गोंधळी, सूर्यवंशी, भोसले, कांबळे या कुटुंबांनी मोलाचे सहकार्य केले. प्रसिद्धी प्रमुख अशोक गुरनाळे यांनी सांगितले की, या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व गावकऱ्यांचे योगदान अमूल्य ठरले आहे.

# सोमय मुंडे यांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा राज्यस्तरीय बाल स्नेही पुरस्कार जाहीर

लातूर :- पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून बालकांसंदर्भात केलेल्या कामगिरीचा आधार घेऊन पुरस्कार जाहीर झाला असून त्याचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे आहे.
शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर क्राईम, पोक्सो कायदा, रॅगिंग कायदा, बालविवाह, बालमजुरी, वाहतूक नियमन, ज्येष्ठ नागरिक कायदा, विविध हेल्पलाइन्स इत्यादी बाबत जनजागृती करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली इन्स्पेक्टर दामिनी ही १४ चित्रकथांची पुस्तिका महाराष्ट्रात प्रथमच तयार करण्यात आली आहे. डमी गन, चाकू, तलवार व वाहनांसोबत स्टंट असणारे दृश्य सोशल मीडियाद्वारे पोस्ट करणारे तरुणांना सायबर सेलच्या माध्यमातून शोधून यातील अल्पवयीन मुलांना त्यांच्या पालकांसह बोलावून असे गैर कृत्य न करणे बाबत समुपदेशन करून अशा प्रकारे १५७ मुलांना साभार परत करण्यात आले आहे.

लातूर शहर व जिल्ह्यातील विविध शाळांमधील ३० हजार विद्यार्थ्यांची पोलीस सुरक्षा संदर्भात जनजागृती करण्यासाठी निबंध लेखनस्पर्धा घेण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांकरिता लातूर जिल्हा पोलीस दलाकडून भव्य पोलीस प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असून यात हजारो शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.



काही कॉफी शॉप चालक विद्यार्थ्यांना डार्क रूम, आडोसा करून चुकीच्या कृत्यांना वाव देत होते ही बाब निदर्शनास येतात मा पोलीस अधीक्षक साहेब यांनी पत्रव्यवहार करून दिनांक २० जून २०२३ पासून मा जिल्हाधिकारी साहेब लातूर यांनी कॉफी शॉप चालकांकरीता अधिसूचना जारी केली आहे.

विद्यार्थी व नागरिकांना पोलीस सुरक्षा संबंधी जनजागृती करण्यासाठी प्रत्येक वर्षी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. टाटा सामाजिक आणि विज्ञान संस्था ची प्रयास च्या सहकार्याने राज्यात प्रथमच २ दिवशीय अपराधी पुनर्वसन कार्यशाळेचे आयोजन करून यात १८९ अपराधी सामील झाले होते.

याशिवाय महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य यांचे उपस्थितीत बालकांसंदर्भात २ कार्यशाळांचे आयोजन, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष च्या मदतीने ऑपरेशन मुस्कान अंतर्गत अल्पवयीन मुला-मुलींचा शोध, बाल कामगार व बाल मजुरी यास प्रतिबंध करण्यासाठी कायदेशीर कारवाई. आषाढी एकादशीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांची सायबर वाहतूक जनजागृती दिंडीचे आयोजन, दामिनी पथक, भरोसा सेल च्या माध्यमातून १ लाखांपेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांना भेट देऊन त्यांना पोक्सो कायदा, विविध सुरक्षा संबंधी हेल्पलाइन्स, गुड टच बॅड टच इत्यादी संबंधित जनजागृती करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी बालकांच्या सुरक्षितेसाठी अखंडपणे, प्रभावीपणे केलेल्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२४ च्या बालस्नेही पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

## भूखंडमाफ्याच्या रिकाम्या जमिनीवर डोळे उद्यानासाठी आरक्षित जागेवर उद्यान किंवा रुग्णालय उभारा माजी नगराध्यक्ष इसा खान यांची मागणी

किनवट: शेख शौकत :-काही भुखंड माफियांनी शहरातील अनेक नगर पालिकेच्या जागा गिळंकृत झाल्याचे चित्र असतानाही नगर परिषद हद्दीतील सुभाष नगर येथे उद्यानासाठी आरक्षित असलेल्या ०.७८ आर क्षेत्रावर अतिक्रमण होऊन हडप होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने त्या संपूर्ण क्षेत्राला संरक्षण भिंत बांधून त्या जागेवर उद्यान किंवा शासकिय रुग्णालय उभारावे, अशी मागणी माजी नगराध्यक्ष इसा खान सरदार खान यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नगर पालिका प्रशासन ही जागा संरक्षित करण्यास दुर्लक्ष करत असल्यामुळे कोणत्याही क्षणी भूखंड माफिया या जागेवर बेकायदेशीर ताबा करून हडप करण्याची शक्यता आहे. नगर पालिकेच्या डीपी प्लॅन नोंदीनुसार शेत भू. क्र. २५८ मधील ०.७८ आर एवढे क्षेत्र हे उद्यानासाठी आरक्षित असल्यामुळे या जागेवर कोणी बेकायदेशीर ताबा करू नये यासाठी त्वरित ०.७८ आर या मोकळ्या जागेला संरक्षण भिंत बांधून संरक्षित करावे व तेथे.

## मनपातील एलबीटी विभाग बंद मराठवाडा व्यापारी महासंघाच्या मागणीला यश

लातूर : राज्यातील सर्व महानगरपालिकांना ३० एप्रिलपर्यंत एलबीटी विभाग बंद करण्याचे आदेश शासनाने काढले आहेत. सरकारने २०१७ पासून एलबीटी कायदा रद्द केला. एलबीटी कराच्या नावाखाली स्थानिक प्रशासनाकडून व्यापाऱ्यांना त्रास दिला जात होता. या संदर्भात मराठवाडा व्यापारी संघाने एलबीटी रद्द करावी, अशी मागणी केली होती. राज्य सरकारने तब्बल ८ वर्षानंतर हा विभाग बंद करण्याचा आदेश दिल्याने मुख्यमंत्री व सर्व मंत्रिमंडळाचे व्यापारी महासंघाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहेत. व्यापारी संघटनांनी एलबीटीच्या विरोधात आवाज उठवल्याने सरकारने हा निर्णय घेतला. मराठवाडा व्यापारी महासंघ कायम एलबीटीच्या विरोधात होता. यापूर्वी एलबीटीच्या नावाखाली स्थानिक प्रशासनाकडून व्यापाऱ्यांना त्रास दिला जात असल्याचे निवेदन मराठवाडा व्यापारी महासंघाने वेळोवेळी सरकारकडे दिले होते. या निर्णयाचे मराठवाडा व्यापारी महासंघाने स्वागत केले आहे. लातूर महानगरपालिकेतही एलबीटीचा कायदा अंमलात आणण्यात आला होता. त्या वेळीही व्यापारी महासंघाने या कायद्याचा तीव्र विरोध केला. परंतु प्रशासनाकडून एलबीटी कायद्याबाबत कायम संदिग्धता ठेवण्यात आली होती. एलबीटी विभाग अनावश्यकपणे काम करीत राहिला आणि अयोग्य मूल्यांकन होत होते. याबाबत व्यापारी महासंघाचा सुरूवातीपासून विरोध होता. या निर्णयामुळे मराठवाड्यातील व्यापाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE